# श्री. बळीराम बानाजी ठवकर

सेवक क्र. ८९९ मु.पो. कान्हाळगांव, त.जि. भंडारा

माझ्या घरी दि. २४-१-१९७९ रोजी मुलगा जन्मास आला. त्याचे दोन्ही डोळे आंधळे व पाय लंगडे असल्याचे लक्षात आले. तो दोन्ही डोळे उघडत नव्हता आणि पायामध्ये अढी होती. बाळंतपणात मुलाचे डोळे आले असावेत म्हणून त्या मुलाकडे पाचसहा दिवस आम्ही लक्षच दिले नाही. मुलगा डोळे उघडत नाही म्हणून आम्हाला चिंता लागली. त्याकरिता इकडे-तिकडे धावपळ करु लागलो. डोंगरगावचे श्री. पंचभाई हे कान्हाळगावला शिक्षक होते. त्यांना जन्मलेल्या मुलाबद्दल सविस्तर माहिती सांगितली. त्यांनी पंचाग पाहून तुमच्या मुलाचे नाव 'नी' ह्या शब्दाने सुरुवात होणारे ठेवा असे सांगितले. नाव ठेवतेवेळी ब्राह्मणाच्या हस्ते हवन कार्य करुन मुलाचे नामकरण केले. त्या दिवशी ब्राह्मणाचे हस्ते हवन कार्य केले तरी मुलाने डोळे उघडले नाहीत.

नंतर मी मोहगावला शक्तीमातेकडे गेलो. तिथे शक्ती-उपासक लक्ष्मण बाबा राहतात. त्यांच्याकडे मुलांची आराधना घेऊन गेल्यावर त्यांनी सांगितले की मुलाचा जन्म जोड नक्षत्रामध्ये झालेला आहे म्हणून हा मुलगा आंधळा, लंगडा जन्मास आला. त्यांच्याकडून मी त्या मुलाचे उपचार केले. त्यांनी आपल्याजवळील राख दिली व ती ती न दिवस मुलाच्या अंगावर फुंकायला सांगितली. तसेच सात दिवस सात रंगाचा पिठाचा दिवा तयार करुन तो पाण्यात शांत करावा असे सांगितले. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे वरील सर्व उपचार करुनही फायदा झाला नाही.

नंतर डॉ. कोरडे, मेडीकल ऑफीसर, प्राथमिक स्वास्थ्य केंद्र, मोहाडी यांनी मुलाला दाखविले. डॉक्टरांनी तपासले व डोळयाकरिता व पोटात घेण्याकरिता उच्च प्रतिचे औषध लिहून दिले. मुलाला दोन दिवस औषध देऊनही काहीच फायदा झाला नाही. मुलांच्या डोळ्यांकरिता व पायांकरिता घरच्या कुलदेवतेसमोर कापूर लावून आराधना केली तरीही फायदा झाला नाही. नंतर एका भगवंताला मानणारे मोरगावचे सेवक श्री. ढबाले गुरुजी, हे कान्हळगावाला शिक्षक होते. त्यांच्याकडे मी गेलो व त्यांना मुलाबद्दल व आजपर्यंत केलेल्या निरनिराळ्या उपचारांबद्दल सविस्तर माहिती दिली. मी त्यांना घरी घेऊन आलो. मी मुलाकरिता तीर्थ देण्याबद्दल त्यांना विनंती केली. त्यांनी मुलांकरिता तिर्थ करुन दिले व सांगितले की, मुलाचे औषध बंद

करुनही तुम्ही पाच दिवसांचे साधे कार्य करा. दि. ७-१२-१९७९ ला कार्यास सुरुवात केली. तो मुलाच्या जन्माचा पंधरावा दिवस होता. मुलाने साध्या कार्याच्या तिसऱ्या दिवशी डोळे उघडून पाहण्यास सुरुवात केली. तेव्हा माझा या तत्त्वावर पूर्ण विश्वास बसला.

कार्याच्या चौथ्या दिवशी बाबांचा दौरा भंडारबोडीला असताना मी त्यांना भेटायला बेलो. भेटीत मी सर्व अनुभव बाबांना सांगितले. बाबांनी मला योग्य मार्गदर्शन केले, आणि बंधनाचे अकरा दिवस व बेचाळीस दिवस देण्याबद्दल श्री. ढबाले गुरुजी यांना बाबांनी आदेश दिला.

दि. १७-१२-७९ ला बंधनाचे अकरा दिवस सुरु केले. त्या अवधीमध्ये दि. १२-१२-७९ ला मला स्वप्नात जागृती मिळाली. महानत्यागी बाबा जुमदेवजी स्वयं आले व मला म्हणाले, ''अरे ऊठ! बाबा आले! त्यांचे पाय धुऊन दे. मी पाण्याची बादली व पाट घेऊन बाहेर निघालो. पाट खाली ठेवला तर भगवान बाबा हनुमानजी पाटावर चढले. मी त्यांचे पाय धुऊन दिले. नंतर महानत्यागी बाबा जुमदेवजी पाटावर चढले मी त्यांचेपण पाय धुऊन दिले नंतर दोघेही, मी ज्या ठिकाणी परमेश्वराला ज्योत लावीत होतो त्या ठिकाणी आले. महानत्यागी बाबा जुमदेवजी हे भगवान बाबा हनुमानजींमध्ये विलीन झाले व एकटेच भगवान बाबा हनुमानजी दिसू लागले. मी त्यांच्यासमोर बसलो आहे. तेव्हा बाबा हनुमानजींची मला विचारले, तुला काय पाहिजे ते माग, मी म्हणालो मला सुख-शांती पाहिजे. मुलाचे डोळे स्पष्ट उघडून द्या. मुलाचे हात-पाय सरळ करुन द्या. माझे जमिनीच्या सौद्याबद्दल श्री. श्रावणजी ठवकर यांच्याकडे पत्र पाठविले आहे. त्याचे उत्तर अजून मिळाले नाही. त्यामुळे मी फार चिंतेत आहे. माझी नोकरी पंचायत समिती, मोहाडी येथे आहे. रात्रीची ड्यूटी आहे. ती बदलवून मला रेग्युलर चपराशामध्ये (बढती) नोकरी मिळवून द्या. हे माझे भाग्य ऐकल्यावर बाबा हनुमानजी म्हणाले ठीक आहे. तुझ्या पत्राचे उत्तर उद्या येईल. तेव्हा मी विचारले, रजिस्ट्रीची तारीख कोणती पक्की होईल? बाबा हनुमानजी बोलले २२-२-७९ ला रजिस्ट्री होईल. तुझी नोकरी बदलेल. बाबा हनुमानजी स्वतः मुलाजवळ जाऊन त्यांनी दोन्ही हातांनी मुलाचे डोळे उघडले व पाय धरुन ओढले व पुन्हा जागेवर येऊन बसले.

मला जाग आली. दुसऱ्याच दिवशी सोमवारला एक आंतरदेशीय पत्र मला मिळाले. त्या पत्रात ठळक अक्षरात लिहिले होते की, दि. २२-२-७९ रोजी गुरुवारला मी नागपूरहून भंडाऱ्याला येतो. तुम्ही पण भंडाऱ्याला येऊन आपली रजिस्ट्री करुन घ्यावी. जागृतीमध्ये भगवान बाबा हनुमानजीने सांगितल्याप्रमाणे बरोबर पत्र आले. रजिस्ट्री झाली. मुलाचे डोळे व हातपाय सरळ झाले व कुटुंबात समाधान सुध्दा लाभले.

दुसऱ्या दिवशी मंगळवार होता. मला चिंता पडली की, मी घरी ३,००० रुपये

ठेवले होते. मी रात्री नोकरीसाठी मोहाडी येथे जाईन. घरी आई व पत्नी आहे. जिकडे तिकडे डाके पडत आहेत. त्यामुळे मला चिंता वाटू लागली. त्या दिवशी पुन्हा जागृती मिळाली. ''मोठ्या जोराने ठां..ठां..ठां असा आवाज झाला. मी उठून पाहिले तर ज्या पेटीत पैसे ठेवले होते त्या पेटीवर एक मोठा साप गुंडाळी घालून वर फणा करुन बसलेला मला दिसला. मी त्याला म्हणालो, तू साप नाहीस. तू बाबा हनुमानजीच आहेस. तेव्हा त्यांनी फणा हलवला आणि मला जाग आली.'' दुसऱ्या दिवशी ही हकीगत सांगण्याकरिता मी श्री.ढबाले गुरुजी यांच्याकडे गेलो. तेव्हा ढबाले गुरुजींनी सांगितले की, आपला भगवान जागृत आहे आपल्याला कोणत्याही प्रकारची चिंता करण्याची गरज नाही. रक्षण करणारा व सांभाळणारा भगवान आहे.

बेचाळीस दिवसांचे कार्य सुरु असताना मी एक दिवस रस्त्यावर गेलो. तिथे मला दुर्गाप्रसाद नावाचा एक मुलगा ऊस घेऊन जात होता. मी त्यांच्याकडून ऊस घेतला. पण पैसे द्यायला विसरलो. ऊस खाल्ल्यावर मी घरी परत आलो. मुलीला खुप ताप आला होता. काही वेळाने आपण ऊसाचे पैसे दिले नाहीत हे लक्षात आले. या चुकीबद्दल भगवान बाबा हनुमानजींची क्षमा मागण्याकरिता कापूर लावून म्हणालो, जर खरोखर तू भगवान आहेस तर माझ्या मुलीचा ताप ताबडतोब कमी कर. मी त्या मुलाला ऊसाचे पैसे परत करतो असे सांगून पैसे परत करण्याकरिता गेलो. पैसे देऊन घरी परत आलो. माझ्या मुलीचा ताप कमी झाला असून मुलगी खेळत आहे असे दिसले. याप्रमाणे परमेश्वराने माझे शब्द ऐकून ते खरे करुन दाखविले. ही परमेश्वराचीच कृपा होय.

अशाप्रकारे मी बेचाळीस दिवसांची कार्याची १०-४-७९ ला हवन कार्य करुन समाप्ती केली. तेव्हापासून माझ्या कुटुंबात सुख, शांती आणि समाधान एकाच भगवंताच्या कृपेने व महानत्यागी बाबा जुमदेवजींच्या मार्गदर्शनाने सतत लाभले आहे. अशा कृपेला मी ''जीवनात सांभाळून ठेवीन.''

* * * * *